# मुंबई विद्यापीठ

क्रं.सा.प्र.वि./GAD/ICM/2012-13/320/२०१२

परिपत्रक:

विद्यापीठातील सर्व संस्थांचे संचालक, विभागांचे विभाग प्रमुख, सर ज.जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य, मुंबई विद्यापीठ ग्रंथालयाचे ग्रंथपाल, प्रभारी परीक्षा नियंत्रक, वित्त व लेखा अधिकारी, सर्व उपकुलसचिव, नियंत्रक, मुद्रण व लेखन सामग्री, विद्यापीठ अभियंता, सुरक्षा अधिकारी, सर्व सहायक कुलसचिव आणि कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे /कक्षांचे प्रमुख यांना कळविण्यात येते की, शासन निर्णय क्रं.संकीर्ण २०१०/(६८७/१०) विशि-१ दिनांक ५ जानेवारी, २०११ नुसार विद्यापीठामध्ये शिक्षक/अधिकारी व कर्मचारी यांना कार्यालयीन उपस्थितीसाठी संगणकीय नोंदणी प्रणाली (Bio Metric System) १ जूलै २०१२ पासून लागू करण्यात येत आहे.

मा.कुलगुरूंच्या आदेशानुसार कळविण्यात येते की, विद्यापीठातील सर्व संबंधितांनी याची नोंद घ्यावी तसेच त्यासाठी संगणकीय नोंदणी प्रणालीमार्फत दोन्ही हातांचे ठसे (Bio Metric System) नोंद घेण्याची प्रक्रिया फोर्ट परिसरातील कर्मचा-यांसाठी खोली क्रं.५ विद्यापीठ इमारत तसेच विद्यानगरी परिसरातील कर्मचा-यांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, कलिना परिसर येथे दिनांक २० जून २०१२ पासून सूरू करण्यात येणार आहे. तरी सर्व संबंधितांनी संगणक प्रणालीवर आपले हातांचे ठसे नोंदवावेत व १ जूलै २०१२ पासून आपली उपस्थिती संगणक प्रणालीवर नोंदवावी.

सर्व संबंधितांना पूढे असेही सूचीत करण्यात येते की त्यांनी त्यांच्या रजेचा तपशिल वेळेत सर्व संबंधित अधिका-यांना/ प्रशासनास सादर करावा.

( कुमार खैरे )
कुलसचिव

मुंबई ४०००३२
१८ जून २०१२

Uploaded on 25th June, 2012